पत्र

जा.क्र.कृआ/विप्र.३/राअसुअ/ऊस/योजना/ १८८४२ /२१
कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,साखर संकुल,पुणे
दिनांक : २४ / ६/२०२१

प्रति,

१) **विभागीय कृषि सह संचालक,**
पुणे / कोल्हापूर /औरंगाबाद /लातूर

२) **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
अहमदनगर/ पुणे/ सोलापूर/ सातारा/सांगली/ कोल्हापूर/ औरंगाबाद/ जालना/बीड/ लातूर/उस्मानाबाद/ नांदेड /परभणी/ हिंगोली

**विषय : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम सन २०२१-२२ च्या अंमलबजावणीबाबत ...**

**संदर्भ :** १. केंद्र शासनाच्या Re-vamped NFSM Operational Guidelines २०१८-१९ to २०१९-२०
२. केंद्र शासनाचे पत्र क्र.File No.२-९/२०२०-सीयु/चार,दि.१४/०६/२०२१
३.कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.कृआ/नपि/विप्र३/राअसुअ-ऊस/२४०/१९, दि. ३१/०५/२०१९
४.कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-०९१९/प्र. क्र. २२१/ १४-अे, दि. ०४/११/२०२०
५.शासन निर्णय क्रमांक राअसुअ-२०२१/प्र.क्र.३९/४- अे,मंत्रालय, मुंबई, दि.२२/०६/२०२१

केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ च्या पत्रान्वये सन २०२१-२२ करीता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान - व्यापारी पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रमासाठी मंजुरी दिली आहे. सदर कार्यक्रमासाठी अर्थसहाय्याचे प्रमाण केंद्र व राज्य ६०:४० टक्के राहणार असल्याचे कळविले आहे.राज्य शासनाने संदर्भ क्र. ५ अन्वये केंद्र हिस्सा रू.१६३.०० लाख व राज्य हिस्सा रू. १०९.०० लाख असा एकूण रू.२७२.०० लाखाच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

जिल्हानिहाय, बाबनिहाय कार्यक्रम **परिशिष्ट क्र. १** मध्ये व जिल्हानिहाय मंजूर कार्यक्रम **परिशिष्ट क्र.२** मध्ये सोबत सहपत्रीत केला आहे.केंद्र शासनाच्या Re-vamped NFSM Operational Guidelines व संदर्भ क्र.३ नुसार सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान-अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम राबविण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये घालून दिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करून सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.सन २०१९-२० च्या मार्गदर्शक सूचना कृषि विभागाच्या संकेतस्थळावर (http://www.krishi.maharashtra.gov.in) उपलब्ध आहेत.

कृषि विभागांच्या योजनांची महा-डीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्याबाबत संदर्भांकित शासन निर्णय दि. ०४/११/२०२० नुसार पीक प्रात्यक्षिके व कृषि यांत्रिकीकरण या बाबींची अंमलबजावणी करण्यात यावी.

१. **पीक प्रात्यक्षिकाकरिता** सन २०१९-२० च्या मार्गदर्शक सुचनांन्वये व **महा-डीबीटी** प्रणालीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. तसेच प्रात्याक्षिके भेटीचा तपशील (प्रपत्र ४ अ व ४ब) व पीक प्रात्यक्षिकांतील तालुकानिहाय उत्पादकता अहवाल (प्रपत्र-२) याबाबतचे अभिलेख आपले स्तरावर जतन करून विहित प्रपत्रात अहवाल आयुक्तालयास सादर करावेत.पीक प्रात्यक्षिकांचे १०० टक्के जिओ टॅगींग (Geo Tagging) **करण्यात यावे याबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सनियंत्रण करावे.**

२.**ऊती संवर्धित रोपे तयार करुन अनुदानावर वाटप करणे**- या बाबीकरिता मुद्दा क्र.२ नुसार २.८६ लाख रोपे वाटपाची कार्यवाही करावी.

३. **मुलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य**- या बाबीकरिता मुद्दा क्र.३ नुसार कार्यवाही करावी. सदर घटकासाठी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सातारा व हिंगोली यांनी अनुक्रमे मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र, पाडेगाव व प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर यांना आर्थिक मर्यादेत अनुदान अदा करावे.

४. **पीक संरक्षण औषधी व बायो-एजंटच चे वितरण** या बाबीकरिता मुद्दा क्र.४ नुसार कार्यवाही करावी.

५. **मनुष्य बळ विकास कार्यक्रम (राज्यस्तरीय प्रशिक्षण)** या बाबीकरिता मुद्दा क्र.५ नुसार कार्यवाही करावी.

६. **शुगरकेन श्रेडरचे वाटप** या बाबीकरिता सन २०१९-२० च्या मा.सू. मधील मुद्दा क्र.६ नुसार तसेच महाडीबीटी प्रणालीच्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करावी.

शुगर केन श्रेडर या यंत्राकरिता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, व महिला यांच्यासाठी श्रेडर यंत्राच्या किंमतीच्या ५० टक्के कमाल रु. १.२५ लाख प्रती युनिटच्या मर्यादेत तर इतर लाभार्थ्यांसाठी श्रेडर यंत्राच्या किंमतीच्या ४० टक्के कमाल रु. १.लाख प्रती युनिटच्या मर्यादेत अर्थसहाय्य देय राहील.

७. **अभियान अंमलबजावणीसाठी तपासणी** सन २०१९-२० च्या मार्गदर्शक सुचनांनुसार विविध स्तरावर खर्चाच्या टक्केवारीनुसार तपासणीची कार्यवाही पुर्ण करावी.

तपासणीच्या टक्केवारीचे प्रपत्र

| अ.क्र. | स्तर | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | विभागीय कृषि सह संचालक | ०.५ |
| २ | जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी | १ |
| ३ | उप विभागीय कृषि अधिकारी | ५ |
| ४ | तालुका कृषि अधिकारी | २५ |
| ५ | मंडल कृषि अधिकारी | ५० |
| ६ | कृषि पर्यवेक्षक/ कृषि सहाय्यक | १०० |

८. अभियानाचे सनियंत्रण व मूल्यमापन -

- निवडलेल्या लाभार्थ्यांची प्रवर्गनिहाय माहिती केंद्र शासनाच्या http://www.nfsm.gov.in या वेबसाईटवर तसेच कृषि विभागाच्या MIS मध्ये ऑनलाईन वेळेत भरण्याची जबाबदारी जिल्हा कार्यालयाची राहील.
- मासिक प्रगतीचा अहवाल आयुक्तालयाने विहित केलेल्या प्रपत्रात प्रवर्गनिहाय दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करावा.
- निधी प्राप्त झाल्यापासुन १५ दिवसात घटकनिहाय, प्रवर्गनिहाय लाभार्थी यादी संकेत स्थळावर भरणे बंधनकारक राहील.
- सदर कार्यक्रमांतर्गत गावनिहाय वाटप केलेल्या निविष्ठा, प्रात्यक्षिके व इतर दिलेले लाभ याबाबतची माहिती लाभार्थ्यांच्या यादीसह ग्रामपंचायतीकडे पाठवून सदरील माहिती ग्रामसभेत जाहीर करावी.
- सदर कार्यक्रमांतर्गत राबविलेल्या सर्व घटकांमुळे प्रकल्प क्षेत्रातील पिकांच्या उत्पादकतेवर दिसून आलेल्या परिणामांचे मूल्यमापन करून त्याबाबतचा सविस्तर अहवाल उपविभागीय कृषि अधिकारी यांनी हंगामाच्या अखेरीस सादर करावा.
- सदर कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांनी/गटांनी उत्कृष्टपणे राबविलेल्या कार्यक्रमाच्या यशोगाथा छापील/ डिजिटल स्वरुपात तयार करून आयुक्तालयास सादर कराव्यात.
- जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी तालुकानिहाय लक्षांक निर्धारित करून क्षेत्रिय स्तरावर सदर कार्यक्रमाची अंमलबजावणी करावी.

*सोबत - वरीलप्रमाणे*

(विकास पाटील)
अभियान संचालक (राअसुअ) तथा
कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण)
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत-

१. मा. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई ३२, यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, तिसरा मजला, प्रभादेवी, मुंबई-६५
३. मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ महाबीज, कृषिनगर अकोला
४. मा. जिल्हाधिकारी,
अहमदनगर/पुणे/सोलापूर/सातारा/सांगली/कोल्हापूर/औरंगाबाद/जालना/बीड/लातूर/ उस्मानाबाद/ नांदेड /परभणी/ हिंगोली
५. संचालक, निविष्ठा व गुणनियंत्रण, कृषि आयुक्तालय, पुणे

६. संचालक, कृषि नियोजन व प्रक्रिया, कृषि आयुक्तालय, पुणे
७. संचालक (कृषि संशोधन व विस्तार),वसंतदादा साखर संस्था, मांजरी बुद्रुक, ता. हवेली,जि.पुणे
८. संशोधन संचालक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा-अहमदनगर.
९.संशोधन संचालक, वसंतराव नाईकमराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
१०. प्रादेशिक ऊस संशोधन केंद्र, वसमतनगर,जि. हिंगोली
११.ऊस विशेषज्ञ, मध्यवर्ती ऊस संशोधन केद्र, पाडेगांव, ता.फलटण जि. सातारा.
१२.कृषि उपसंचालक, मा. आयुक्त कृषि कक्ष, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३. कक्ष अधिकारी, ४-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

परिशिष्ठ-१

## राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान वाणिज्यिक पिके अंतर्गत ऊस विकास कार्यक्रम २०२१-२२ चे जिल्हानिहाय भौतिक व आर्थिक लक्षांक

(रक्कम रु. लाखात)

| अ.क्र | जिल्हा | सर्वसाधारण क्षेत्र ("००" हे.) | एक डोळा पध्दतीने/ पट्टा पध्दतीचा अवलंब व आंतरपीक प्रात्यक्षिके ( रु.९०००/- हे.) | | मुलभूत बियाणे उत्पादनासाठी अर्थसहाय्य (कृषि विद्यापीठ प्रक्षेत्र) (रु.४००००/ हे.) | | उती संवर्धित रोपे निर्मिती (रु. ३.५०/- प्रति रोप) | | राज्यस्तरीय प्रशिक्षण (रु.४००००/- प्रति प्रशिक्षण) | | पीक संरक्षण औषधे व बायो-एजंटस चे वितरण (रु.५०० प्रति हे) | | शुगरकेन लिफ श्रेडरचे वाटप: अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला यांच्यासाठी किमतीच्या ५० टक्के कमाल रु. १.२५ लाख प्रती युनिट | | शुगरकेन लिफ श्रेडरचे वाटप: सर्वसाधारण प्रवर्ग लाभार्थ्यांसाठी किमतीच्या ४० टक्के कमाल रु.१.०० लाख प्रती युनिट | | श्रेडर- एकुण आर्थिक | एकुण आर्थिक लक्षांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | भौतिक | आर्थिक | | |
| १ | अहमदनगर | १०२६ | २०० | १८.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | २०.७५ |
| २ | पुणे | १३०६ | ३५० | ३१.५० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १२० | ०.६० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ३४.३५ |
| ३ | सोलापूर | १३७५ | ३५० | ३१.५० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २०० | १.०० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ३४.७५ |
| विभागीय स्तर | | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.४० |
| **पुणे विभाग** | | ३७०७ | ९०० | ८१.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ४२० | २.१० | ३ | ३.७५ | ३ | ३.०० | ६.७५ | ९०.२५ |
| ४ | सातारा | ६५३ | १५० | १३.५० | १० | ४.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | २०.२५ |
| ५ | सांगली | ७४९ | १५० | १३.५० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | १६.२५ |
| ६ | कोल्हापूर | १५८९ | ५०० | ४५.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | २०० | १.०० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ४८.२५ |
| विभागीय स्तर | | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.४० |
| **कोल्हापूर विभाग** | | २९९१ | ८०० | ७२.०० | १० | ४.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ४०० | २.०० | ३ | ३.७५ | ३ | ३.०० | ६.७५ | ८५.१५ |
| ७ | औरंगाबाद | १६० | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| ८ | जालना | २०५ | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| ९ | बीड | ३४२ | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| विभागीय स्तर | | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.४० |
| **औरंगाबाद विभाग** | | ७०६ | ३०० | २७.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ३०० | १.५० | ३ | ३.७५ | ३ | ३.०० | ६.७५ | ३५.६५ |
| १० | लातूर | ३५७ | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| ११ | उस्मानाबाद | ३५७ | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| १२ | नांदेड | १७७ | ५० | ४.५० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ७.२५ |
| १३ | परभणी | २५० | १०० | ९.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ११.७५ |
| १४ | हिंगोली | १०९ | ५० | ४.५० | २ | ०.८० | ० | ०.०० | ० | ०.०० | १०० | ०.५० | १ | १.२५ | १ | १.०० | २.२५ | ८.०५ |
| विभागीय स्तर | | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | १ | ०.४० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | ०.४० |
| **लातूर विभाग** | | १२५० | ४०० | ३६.०० | २ | ०.८० | ० | ०.०० | १ | ०.४० | ५०० | २.५० | ५ | ६.२५ | ५ | ५.०० | ११.२५ | ५०.९५ |
| आयुक्तालय स्तर | | ० | ० | ०.०० | ० | ०.०० | २.८६ | १०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ० | ०.०० | ०.०० | १०.०० |
| **एकूण** | | ८६५४ | २४०० | २१६.०० | १२ | ४.८० | २.८६ | १०.०० | ४ | १.६० | १६२० | ८.१० | १४ | १७.५० | १४ | १४.०० | ३१.५० | २७२.०० |

परिशिष्ठ-२

## रा.अ.सु.अ.अभियानातंर्गत ऊस विकास कार्यक्रम २०२१-२२ -प्रवर्गनिहाय मंजूर कार्यक्रम (रक्कम रु. लाखात)

| अ.क्र. | जिल्हा/विभाग | केंद्र ६० टक्के | | | | | राज्य हिस्सा ४० टक्के | | | | | एकूण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण | अनु.जाती | अनु.जमाती | दिव्यांग (PH) | एकूण केंद्र हिस्सा | सर्वसाधारण | अनु.जाती | अनु.जमाती | दिव्यांग (PH) | एकूण राज्य हिस्सा | सर्वसाधारण | अनु.जाती | अनु.जमाती | दिव्यांग (PH) | एकूण एकंदर |
| १ | अहमदनगर | ८.८४ | १.९९ | १.०० | ०.६२ | **१२.४५** | ५.८९ | १.३३ | ०.६६ | ०.४२ | **८.३०** | १४.७३३ | ३.३२० | १.६६० | १.०३८ | **२०.७५०** |
| २ | पुणे | १४.८० | ३.३४ | १.६७ | १.०४ | **२०.८५** | ९.८७ | २.२२ | १.११ | ०.७० | **१३.९०** | २४.६७३ | ५.५६० | २.७८० | १.७३८ | **३४.७५०** |
| ३ | सोलापूर | १४.८० | ३.३४ | १.६७ | १.०४ | **२०.८५** | ९.८७ | २.२२ | १.११ | ०.७० | **१३.९०** | २४.६७३ | ५.५६० | २.७८० | १.७३८ | **३४.७५०** |
| **पुणे विभाग** | | **३८.४५** | **८.६६** | **४.३३** | **२.७१** | **५४.१५** | **२५.६३** | **५.७८** | **२.८९** | **१.८१** | **३६.१०** | **६४.०७८** | **१४.४४०** | **७.२२०** | **४.५१३** | **९०.२५०** |
| ४ | सातारा | ८.६३ | १.९४ | ०.९७ | ०.६१ | **१२.१५** | ५.७५ | १.३० | ०.६५ | ०.४१ | **८.१०** | १४.३७८ | ३.२४० | १.६२० | १.०१३ | **२०.२५०** |
| ५ | सांगली | ६.९२ | १.५६ | ०.७८ | ०.४९ | **९.७५** | ४.६२ | १.०४ | ०.५२ | ०.३३ | **६.५०** | ११.५३८ | २.६०० | १.३०० | ०.८१३ | **१६.२५०** |
| ६ | कोल्हापूर | २०.७२ | ४.६७ | २.३४ | १.४६ | **२९.१९** | १३.८२ | ३.११ | १.५६ | ०.९७ | **१९.४६** | ३४.५४२ | ७.७८४ | ३.८९२ | २.४३३ | **४८.६५०** |
| **कोल्हापूर विभाग** | | **३६.२७** | **८.१७** | **४.०९** | **२.५५** | **५१.०९** | **२४.१८** | **५.४५** | **२.७२** | **१.७०** | **३४.०६** | **६०.४५७** | **१३.६२४** | **६.८१२** | **४.२५८** | **८५.१५०** |
| ७ | औरंगाबाद | ५.१८ | ०.९७ | ०.५८ | ०.३६ | **७.०९** | ३.४५ | ०.९८ | ०.३९ | ०.२४ | **५.०६** | ८.६२७ | १.९४४ | ०.९७२ | ०.६०८ | **१२.१५०** |
| ८ | जालना | ५.०१ | १.१३ | ०.५६ | ०.३५ | **७.०५** | ३.३४ | ०.७५ | ०.३८ | ०.२४ | **४.७०** | ८.३४३ | १.८८० | ०.९४० | ०.५८८ | **११.७५०** |
| ९ | बीड | ५.०१ | १.१३ | ०.५६ | ०.३५ | **७.०५** | ३.३४ | ०.७५ | ०.३८ | ०.२४ | **४.७०** | ८.३४३ | १.८८० | ०.९४० | ०.५८८ | **११.७५०** |
| **औरंगाबाद विभाग** | | **१५.१९** | **३.२२** | **१.७१** | **१.०७** | **२१.१९** | **१०.१२** | **२.४८** | **१.१४** | **०.७१** | **१४.४६** | **२५.३१२** | **५.७०४** | **२.८५२** | **१.७८३** | **३५.६५०** |
| १० | लातूर | ५.१८ | १.१७ | ०.५८ | ०.३६ | **७.२९** | ३.४५ | ०.७८ | ०.३९ | ०.२४ | **४.८६** | ८.६२७ | १.९४४ | ०.९७२ | ०.६०८ | **१२.१५०** |
| ११ | उस्मानाबाद | ५.०१ | १.१३ | ०.५६ | ०.३५ | **७.०५** | ३.३४ | ०.७५ | ०.३८ | ०.२४ | **४.७०** | ८.३४३ | १.८८० | ०.९४० | ०.५८८ | **११.७५०** |
| १२ | नांदेड | ३.०९ | ०.७० | ०.३५ | ०.२२ | **४.३५** | २.०६ | ०.४६ | ०.२३ | ०.१५ | **२.९०** | ५.१४८ | १.१६० | ०.५८० | ०.३६३ | **७.२५०** |
| १३ | परभणी | ५.०१ | १.१३ | ०.५६ | ०.३५ | **७.०५** | ३.३४ | ०.७५ | ०.३८ | ०.२४ | **४.७०** | ८.३४३ | १.८८० | ०.९४० | ०.५८८ | **११.७५०** |
| १४ | हिंगोली | ३.४३ | ०.७७ | ०.३९ | ०.२४ | **४.८३** | २.२९ | ०.५२ | ०.२६ | ०.१६ | **३.२२** | ५.७१६ | १.२८८ | ०.६४४ | ०.४०३ | **८.०५०** |
| **लातूर विभाग** | | **२१.७०** | **४.८९** | **२.४५** | **१.५३** | **३०.५७** | **१४.४७** | **३.२६** | **१.६३** | **१.०२** | **२०.३८** | **३६.१७५** | **८.१५२** | **४.०७६** | **२.५४८** | **५०.९५०** |
| आयुक्तालय स्तर | | ६.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **६.००** | ४.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | **४.००** | १०.००० | ०.००० | ०.००० | ०.००० | **१०.०००** |
| **एकूण** | | **११७.६१** | **२४.९५** | **१२.५८** | **७.८६** | **१६३.००** | **७८.४१** | **१६.९७** | **८.३८** | **५.२४** | **१०९.००** | **१९६.०२०** | **४१.९२०** | **२०.९६०** | **१३.१००** | **२७२.०००** |